# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०२.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०१/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५६,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०१/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ११.१६ लिटर दारू असा एकुण ६,२००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ०१/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ९४०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये मदय(दारू) पिवुन वाहन चालविणे या मोहिमेअंतर्गत दि. ०१/०१/२०२३ रोजी हिंगोली जिल्हयामध्ये एकुण १९ बेशिस्त चालकांविरूध्द कलम १८५ मोटर वाहन कायदा अन्वये कार्यवाही करून आरोपीतां विरूध्द मोटर वाहन कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.०१/०१/२०२३ रोजी पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीयाने त्याचे ताब्यातील मोसा क्र एमएच ३८ एसी ६०४१ हि भरधाव वेगात हयगयी व निष्काळजीपणे चालुन मोसा रोडवरील खडयात घालुन फिर्यादीच्या आई नफिसाबी भ्र शेख करीम रा दर्गा मोहल्ला कळमनुरी हिस खाली पाडुन डोक्यास गंभीर दुखापत करून छातीच्या उजव्या बाजुच्या फासळया फॅक्चर केल्या म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.